सत्यमेव जयते

● जुलै २०१८ ● वर्ष : तिसरे ● अंक : दुसरा

# निवडणूक वार्ता

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र




(१ जानेवारी २०१८ ते ३० जून २०१८ पर्यंतचा संक्षिप्त आढावा)




राज्य निवडणूक आयोगातर्फे १ फेब्रुवारी २०१८ रोजी सह्याद्री अतिथिगृहात मुंबईतील विविध देशांच्या महावाणिज्य दुतांची (कौन्सुलेट जनरल) परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव सुमीत मल्लीक, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजगोपाल देवरा, आयोगाचे सचिव शेखर चन्ने यांच्यासह विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# लोकशाही, निवडणुका व सुशासनाबाबत विचारमंथन



भारतीय राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीच्या रौप्य महोत्सवानिमित्त राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठात नोव्हेंबर २०१७ मध्ये एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. अशा परिषदा विभागीय स्तरावर आयोजित करण्यात याव्यात, अशी आग्रही सूचना या राष्ट्रीय परिषदेत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने नाशिक, पुणे, औरंगाबाद, नांदेड, नागपूर व अमरावती येथे विभागीय परिषदांचे ५ जानेवारी ते २२ जानेवारी २०१८ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. या परिषदांमध्ये व्यापक प्रमाणात विचारमंथन झाले.

'लोकशाही, निवडणुका व सुशासन' या विषयावर नागरिकांना सतत शिक्षण देण्यासाठी नवनवीन उपाययोजनांची आवश्यकता असल्याची बाब राष्ट्रीय परिषदेत समोर आली होती. त्यादृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत ६ जानेवारी २०१८ रोजी आदेश निर्गमित केले. त्या अनुषंगाने राज्यभरात हा पंधरवडा साजरा करण्यात आला. त्याचा समारोप समारंभ मा. राज्यपाल आणि मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबईत पार पडला. प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविण्यात आला.

राज्य घटनेतील ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीचा रौप्य महोत्सव विविध उपक्रमांद्वारे साजरा करत असतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचीही लगबग सुरू आहे. गेल्या सहा महिन्यांत काही नगरपरिषदा/ नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. त्याचबरोबर विविध ठिकाणच्या पोटनिवडणुकाही घेण्यात आल्या. आता सांगली-मीरज-कुपवाड, जळगाव, धुळे आणि अहमदनगर महानगरपालिका; तसेच धुळे, नंदुरबार, अकोला व वाशीम या जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी सुरू आहे.

'निवडणूक वार्ता'च्या या अंकात वरील घडामोडींचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेतला आहे. हा अंकही नेहमीप्रमाणे आपल्याला संदर्भाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

**ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

## मार्गदर्शन आणि संकल्पना

**श्री. ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

## प्रबंध संपादक

**श्री. शेखर चन्ने**
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## संपादकीय मंडळ

| | |
|---|---|
| **श्री. अविनाश सणस**<br>प्रभारी उपायुक्त | **श्री. नि. ज. वागळे**<br>प्रभारी उपसचिव |
| **श्रीमती रीना फणसेकर**<br>अवर सचिव | **श्रीमती आरती सरवदे**<br>तहसीलदार |
| **श्रीमती मनीषा मोहिते**<br>तहसीलदार | **श्री. अतुल जाधव**<br>कक्ष अधिकारी |
| **श्रीमती रत्नप्रभा बेले**<br>कक्ष अधिकारी | **श्री. संजय सावंत**<br>कक्ष अधिकारी |
| **श्रीमती सुमन आरोलकर**<br>कक्ष अधिकारी | **श्रीमती मनीषा माने**<br>सांख्यिकी अधिकारी |

**श्रीमती प्रणाली घोंगे,** सहायक आयुक्त

## संपादक

**श्री. जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी



- **प्रकाशक :** राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
- **प्रकाशन क्रमांक :** SEC/P.N.32/2018-1/Newsletter-6
- **मांडणी व मुद्रक :** कॉन्सेप्ट कम्युनिकेशन, मुंबई.
- **छायाचित्रे :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
- निवडणूक वार्ता ही सहामाही गृहपत्रिका असून ती खासगी वितरणासाठी आहे.





## अनुक्रमणिका


१) विभागीय परिषदांतील विचारमंथन ..........................५
२) लोकशाही पंधरवडा ..........................८
३) लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी ..........................९
४) गव्हर्नर कॉनक्लेव्ह ..........................११
५) राजकीय पक्ष: प्रतिमा आणि अपेक्षा ..........................१४
६) सार्वत्रिक आणि पोटनिवडणुका ..........................२०
७) तयारी महानगरपालिका निवडणुकांची ..........................२२
८) आगामी जि.प. आणि पं.स. निवडणुका ..........................२३
९) 'न्यूटन'मधला निवडणुकीचा थरार ..........................२४
१०) आंतरराष्ट्रीय पातळीवर देवाणघेवाण आवश्यक ..........................२५
११) श्रीलंकेच्या शिष्टमंडळाची भेट ..........................२६

# विभागीय परिषदांतील विचारमंथन

भारतीय लोकशाही व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्वाचे स्थान आहे. त्रिस्तरीय लोकशाही व्यवस्थेतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे हे स्थान मजबूत करण्यासाठी सन १९९२ मध्ये ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांना 'स्वतंत्र स्थानिक स्वयंशासन' म्हणून संविधानिक मान्यता मिळाली. त्याचबरोबर त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांच्या माध्यमांतून या ऐतिहासिक घटनेचा रौप्य महोत्सव साजरा केला जात आहे.

या रौप्य महोत्सवानिमित्त २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी मुंबई विद्यापीठात एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. अशा परिषदांचे विभागीय पातळीवर आयोजन झाले पाहिजे, अशी आग्रही सूचना परिषदेत सहभागी झालेले विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी केली होती.

राष्ट्रीय परिषदेतील सूचना लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने नाशिक, पुणे, औरंगाबाद, नांदेड, अमरावती व नागपूर येथे जानेवारी २०१८ मध्ये विभागीय परिषदांचे आयोजन केले गेले. या परिषदांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतानाच भावी वाटचालीचा वेधही घेण्यात आला. या परिषदांच्या निमित्ताने एक व्यापक विचारमंथन झाले. त्यातून काही चांगल्या सूचनाही समोर आल्या.

| अ.क्र. | परिषदेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १. | नाशिक | ५ जानेवारी २०१८ |
| २. | नांदेड | १७ जानेवारी २०१८ |
| ३. | पुणे (ग्रामीण) | १७ जानेवारी २०१८ |
| ४. | नागपूर | १८ जानेवारी २०१८ |
| ५. | पुणे (शहर) | २० जानेवारी २०१८ |
| ६. | अमरावती | २० जानेवारी २०१८ |
| ७. | औरंगाबाद | २२ जानेवारी २०१८ |



**नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात ५ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. ग्रामविकास राज्यमंत्री दादाजी भुसे, नाशिक जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शीतल सांगळे, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालीनीताई विखे-पाटील, महापौर रंजना भानसी, कुलगुरु डॉ. ई. वायुनंदन, विभागीय आयुक्त महेश झगडे, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिषेक कृष्णा, जिल्हाधिकारी राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकारी दीपककुमार मीना, डी. गंगाधरन, पोलीस अधीक्षक संजय दराडे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दिनेश बोंडे आदी उपस्थित होते.**



नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात १७ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. जिल्हा परिषद अध्यक्षा शांताबाई पवार, महापौर शीलाताई भवरे, कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, परभणीचे महानगरपालिका आयुक्त राहुल रेखावार, अपर जिल्हाधिकारी संतोष पाटील, मनपा आयुक्त गणेश देशमुख, उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आदी उपस्थित होते.



पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत (यशदा) १७ जानेवारी २०१८ रोजी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात विभागीय परिषद झाली. पुणे जि.प.चे अध्यक्ष विश्वासराव देवकाते, सांगली जि.प.चे अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, कोल्हापूर जि.प.च्या अध्यक्षा शमिका महाडिक, विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, पुणे जि.प.चे सीईओ सुरज मांढरे, ग्रामीण विकास विभागाचे माजी सचिव सुधीर ठाकरे, उपायुक्त संजयसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.



पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत (यशदा) २० जानेवारी २०१८ रोजी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात विभागीय परिषद झाली. पालकमंत्री गिरीश बापट, पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर सिद्धार्थ धेंडे, विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, एडीआरचे संस्थापक विश्वस्त डॉ. अजित रानडे, निवृत्त सनदी अधिकारी रमानाथ झा, विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, मलकापूरचे उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे आदी उपस्थित होते.



नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात १८ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. महापौर श्रीमती नंदा जिचकार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती नीशा सावरकर, आमदार प्रा. अनिल सोले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, विभागीय आयुक्त अनुप कुमार, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, महानगरपालिका आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात २० जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. पालकमंत्री प्रवीण पोटे, विभागीय आयुक्त पीयुष सिंह, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, माजी महापौर मिलिंद चिमोटे, राजकीय अभ्यासक डॉ. जयप्रकाश पवार, फिरदोस मिर्झा आदी उपस्थित होते.





औरंगाबाद येथे मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनीत २२ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, जिल्हा परिषद अध्यक्षा देवयानी डोणगावकर, महापौर नंदकुमार घोडेले, विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे, महानगरपालिका आयुक्त डॉ. एम. मुगळीकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी मधुकरराजे अर्दड आदी उपस्थित होते.

# लोकशाही पंधरवडा

लोकशाही सुदृढ करण्यासाठी सतत शिक्षणाद्वारे जनजागृती करणे आवश्यक आहे, ही बाब मुंबई विद्यापीठात २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी झालेल्या राष्ट्रीय परिषदेत प्रामुख्याने समोर आली होती. त्या अनुषंगाने 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर सतत शिक्षणासाठी नवनवीन उपक्रम राबविण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. त्याचाच एक भाग म्हणून आयोगाने ६ जानेवारी २०१८ च्या आदेशान्वये २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत राज्यभरात लोकशाही पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त व विभागीयस्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रूपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा करण्याची दक्षता घ्यावी, असे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात नमूद केले होते. जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती आणि जिल्हा परिषदांमार्फत ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला.



## लोकशाही पंधरवड्यातील उपक्रम

- प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मुख्य वक्त्यांच्या भाषणात 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर भाष्य.
- 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर ठिकठिकाणी फलक लावून जनजागृती.
- विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये निबंध, वकृत्व इत्यादी स्पर्धांचे आयोजन.
- लोकशाहीची त्रिस्तरीय रचना; तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्यांबाबत जनजागृती.
- लोकशाही पंधरवड्यानिमित्त विविध संस्था, संघटनांच्या मदतीने जनजागृती.
- विविध उद्योग समूहांच्या सहयोगाने व सहभागाने विशेष कार्यक्रमांचे आयोजन.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींसमवेत खुल्या चर्चांचे आयोजन.

# लोकशाहीच्या बळकटीसाठी




**सोलापूर विद्यापीठाने लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने ७ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित चर्चासत्रास उपस्थित (डावीकडून) सोलापूरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, प्रभारी कुलगुरु प्रा. नितीन करमळकर, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे सचिव शेखर चन्ने, कुलसचिव डॉ. जी. आर. मंझा.**

लोकशाही व्यवस्थेत आपण सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. जागृत राहिले पाहिजे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सतत कटिबद्ध असायला हवे, असा सूर 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर सोलापूर विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात उमटला.

सोलापूर विद्यापीठाने लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने ७ फेब्रुवारी २०१८ रोजी या चर्चासत्राचे आयोजन केले होते. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. प्रभारी कुलगुरु प्रा. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते. आयोगाचे सचिव शेखर चन्ने, सोलापूरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले व सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे प्रमुख पाहुणे होते.

चांगले लोकप्रतिनिधी निवडून देणे ही मतदारांची जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाने विद्यापीठ व महाविद्यालयांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या आम्ही निश्चितच पूर्ण करू. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या विविध पैलूंवर संशोधन करण्यास भर देऊ, असे श्री. करमळकर यांनी आश्वासित केले.

मतदार यादीत आपले नाव आहे की नाही हे प्रत्येकाने दरवर्षी तपासले पाहिजे. निवडणूक आचारसंहितेचे प्रत्येकाने काटेकोर पालन केले पाहिजे. लोकशाहीच्या सुदृढीकरणात युवा पिढीची भूमिका महत्वाची असते. असे प्रतिपादन श्री. भोसले यांनी केले.

## युवकांची भूमिका महत्वाची

युवा पिढी झपाट्याने बदल आत्मसात करते. बदलत्या काळानुसार राज्य निवडणूक आयोगानेही नवनवीन तंत्रज्ञानांचा स्वीकार केला आहे. युवा पिढी उत्साह आणि ऊर्जेचा झरा असते. ही ऊर्जा लोकशाही बळकटीकरणासाठी महत्वपूर्ण ठरू शकते. त्यासाठी युवकांनी लोकशाही, निवडणुका आणि सुशासन या विषयाकडे गांभीर्याने पाहून त्यात सक्रिय झाले पाहिजे.

**-श्री. ज. स. सहारिया,**
राज्य निवडणूक आयुक्त

## निवडणुका आणि प्रसारमाध्यमे

उद्‌घाटन सत्रानंतर 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर परिसंवाद झाला. सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्य निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे व दै. 'सकाळ'चे सहयोगी संपादक अभय दिवाणजी यांनी चर्चासत्रात आपले विचार मांडले.

प्रसारमाध्यमांकडून निवडणूक यंत्रणेला नेहमीच सहकार्य लाभते. निवडणूक प्रक्रिया असो किंवा प्रशासकीय कार्यवाही असो त्यात उणिवा असल्यास त्याची जाणीव प्रसारमाध्यमे करून देतात. म्हणूनच माध्यमांची भूमिका महत्वाची ठरते. असे मत श्री. ढाकणे यांनी व्यक्त केले.

प्रसारमाध्यमांचादेखील आचारसंहितेशी थेट संबंध असतो. निवडणुकीतील प्रसारमाध्यमांची भूमिका आणि जबाबदारीबाबत प्रेस कौन्सिलने मार्गदर्शक तत्वे जारी केले आहेत, त्यांचे आपण पालन केले पाहिजे असे आवाहन श्री. मोरे यांनी केले.

सकाळ वृत्तपत्र समूहाने निवडणूक प्रक्रियेत नेहमीच सकारात्मक सक्रिय सहभाग नोंदविला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या माध्यमातून नेतृत्व मिळविण्याचे काम केले जाते, याची 'सकाळ'ने वारंवार आपल्या वाचकांना जाणीव करून दिली आहे. अशी माहिती श्री. दिवाणजी यांनी दिली.

## लोकशाही आणि युवा नेतृत्व

समारोपाचे सत्र 'लोकशाही आणि युवा नेतृत्व' या विषयावर झाले. आयोगाचे सचिव शेखर चन्ने अध्यक्षस्थानी होते. प्रा. टी. एस. मोरे प्रमुख वक्ते होते.

लोकशाही व्यवस्थेकडे तरुणांनी सकारात्मकतेने बघितले पाहिजे. एकही उमेदवार योग्य नाही असे म्हणून 'नोटा'चा पर्याय स्वीकारणे हीसुद्धा नकारात्मकताच असते. म्हणून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवक पुढे आले पाहिजेत. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवकांमधील सकारात्मक ऊर्जेचा वापर झाला पाहिजे असे प्रतिपादन श्री. चन्ने यांनी केले.

युवकांनी नेतृत्व करण्याचे आवाहन स्वीकारले पाहिजे. आपल्या नेतृत्वगुणांचा विकास केला पाहिजे. नेतृत्व करण्यासाठी दूरदृष्टी, आत्मविश्वास, संयम, निर्णायक क्षमता, संवाद कौशल्ये, चारित्र आदी गुणांची कास धरली पाहिजे. असे आवाहन प्रा. मोरे यांनी केले.

# गव्हरनर्स कॉनक्लेव्ह

राज्य निवडणूक आयोगातर्फे २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला. 'गव्हरनर्स कॉनक्लेव्ह'नावाने या पंधरवड्याचा समारोप समारंभ ०९ फेबुवारी २०१८ रोजी मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला होता. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाही पंधरवडा साजरा करण्यामागील भूमिका विशद केली. राज्याचे मुख्य सचिव सुमित मल्लीक, पोलीस महासंचालक सतीश माथूर, आयोगाचे सचिव शेखर चन्ने यावेळी उपस्थित होते. या परिषदेस राज्य प्रशासनातील विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव, विविध जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी; तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## स्वतंत्र कायदा हवा : श्री. सहारिया

श्री. सहारिया यांनी लोकशाही पंधरवडा साजरा करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व व त्यांच्या सांविधानिक जबाबदारीबद्दल लोकांना सतत शिक्षण देणे आवश्यक असल्याची बाब प्रकर्षाने नोव्हेंबर २०१७ मधील परिषदेतून पुढे आली होती. त्या उद्देशाने हा पंधरवडा साजरा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या भाषणातील काही ठळक मुद्दे असे:

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लोकप्रतिनिधीत्व अधिनियमाच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सध्याच्या कायद्यांतील तरतुदींमधील विसंगती दूर करण्याचीही आवश्यकता आहे.
- अधिकाधिक चांगले उमेदवार पुढे यावेत, यासाठी




**मुंबई येथे राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित लोकशाही पंधरवड्याचा समारोप समारंभास उपस्थित मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्याचे मुख्य सचिव सुमित मल्लीक आणि पोलीस महासंचालक सतीश माथूर.**

आर्थिक बळाचा दुरूपयोग टाळणे, गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना थारा नसणे इत्यादीबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदींची आवश्यकता आहे.

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणाची सुविधा असावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वरूपात किंवा हद्दीत ऐन निवडणुकीच्या तोंडावर बदल होता कामा नये. निवडणूक खर्च भारित खर्च म्हणून धरण्यात यावा.
- शासनाने निवडणुकीच्या काळात संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांची बदली करू नये; तसेच आयोगाच्या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्याही परस्पर बदल्या होता कामा नये.
- राज्य निवडणूक आयोगाच्या आर्थिक स्वायत्ततेबाबत आणि कर्मचारी आकृतीबंधाबाबत तातडीने शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.
- विविध विद्यापीठांनी मतदार नोंदणीच्या कामात पुढाकार घ्यावा; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधनास चालना द्यावी.

## समिती नेमावी : मा. मुख्यमंत्री

लोकशाही बळकटीकरणाकरिता राजकीय संस्कृती अधिक प्रगल्भ होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री. फडणवीस यांनी केले. त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे असे:

- मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी आज उपस्थित केलेल्या विविध मुद्दांबाबत शासन निश्चितच सकारात्मक भूमिका घेईल आणि सर्व विषय मार्गी लावले जातील.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्वायत्तता अबाधित राखण्यासाठी शासन कटिबद्ध असून त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल.
- आयोगाच्या मूल्यांकनानुसार निधीसंदर्भातील शासन निर्णय तात्काळ निर्गमित करण्यात येतील. त्याचबरोबर ऐन निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील बदल, आयोगाच्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या परस्पर होणाऱ्या बदल्या, इत्यादींबाबत आयोगाच्या सूचनांप्रमाणे तातडीने पावले उचलली जातील.
- राज्यामध्ये ज्या कायद्याद्वारे निवडणुका घेतल्या जातात, त्यात मतदान सक्ती करता येईल का, याबाबत विचार करणे आवश्यक आहे. काही लोक धोरणात्मक बाबींवर नेहमी बोलत असतात. परंतु ते मतदानाला जात नाहीत. यासाठी सक्तीच्या मतदानाची आवश्यकता आहे.
- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सातत्याने निवडणुका सुरू असतात. त्याऐवजी एकत्रित निवडणुका घेता येतील का, असा विचार केला पाहिजे. एकत्रित निवडणुका घेतल्यास निवडणूक आयोग, प्रशासन व पोलिसांवरील ताण कमी होण्यास मदत होईल.
- संविधानाने राज्याला दिलेल्या अधिकारांतर्गत निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या धर्तीवर राज्य निवडणूक आयक्तांच्या मार्गदर्शनाखाली आयोगाने एक सर्वसमावेशक कायद्याचा मसुदा तयार केल्यास शासन त्यावर तातडीने कार्यवाही करेल. त्यासाठी आवश्यक असल्यास आयोगाने समिती नेमावी. त्याकरिता योग्य ते अधिकारी उपलब्ध करून दिले जातील.
- सदर समितीने आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना रोखणे; तसेच

सर्व समावेशक नवीन कायदा करणे इत्यादीबाबतचा अभ्यासपूर्ण मसुदा सादर केल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करून त्याला कायद्याचे स्वरूप दिले जाईल.

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी प्राधान्याने व्यवस्था निर्माण केली जाईल.

## ठोस तरतुदींची गरज : मा. राज्यपाल

लोकशाही ही एक जीवनशैली आहे. ती आपल्या देशाची सांस्कृतिक परंपरा आहे. गेली ६९ वर्षं प्रत्येक टप्प्यावर लोकशाही सक्षम होण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत, असे मत मा. राज्यपालांनी व्यक्त केले. त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे असे:

- लोकशाही बळकट करण्यासाठी लोकसहभाग विशेषत: युवकांचा मोठ्याप्रमाणावर सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करावा.
- विविध सामाजिक संस्था, संघटना, गणेश मंडळे यांच्या मदतीने मतदार नोंदणी आणि मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- आपण प्रत्येक टप्प्यावर लोकशाही सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले आहेत; परंतु निवडणुकांमध्ये पैशाचा होणार वापर चिंताजनक असून ते भ्रष्टाचाराचे मूळ आहे.
- निवडणुकीत नोटाला अधिक मते मिळाल्यास करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात ठोस तरतुदी केल्या पाहिजेत. शक्य असल्यास याबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश निर्गमित करावेत. अन्यथा राज्य शासनाने कायदा करण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- निवडणुकीनंतर गावात शांतता व सौहार्दपूर्ण वातावरण राखण्यासाठी प्रभावी प्रयत्नांची आवश्यकता आहे.



**मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे स्वागत करताना राज्य निवडणूक आयक्त ज. स. सहारिया.**

- स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात कर्नाटक व केरळ राज्यांमध्ये अधिक प्रभावीपणे काम सुरु आहे. त्याच्या अभ्यासासाठी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंना व अभ्यासकांना या दोन राज्यांमध्ये पाठवायला हवे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्याकडे हस्तांतरीत करावयाच्या विषयांसंदर्भात कालमर्यादेत परिपूर्ण कार्यवाही झाली पाहिजे.
- निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी राज्य शासनाने एक उत्कृष्ट कायदा करावा. मात्र जोपर्यंत असा कायदा होत नाही तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करून योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

श्री. माथूर आणि श्री. मल्लीक यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव श्री. चन्ने यांनी मान्यवरांचे स्वागत केले. आयोगाच्या अवर सचिव रीना फणसेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# राजकीय पक्ष : प्रतिमा आणि अपेक्षा




**मुंबई येथे ७ मे २०१८ रोजी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात राजकीय पक्षांच्या कार्यशाळेस उपस्थित (डावीकडून) राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, राज्य निवडणूक आयक्त ज. स. सहारिया आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी.**

राज्य निवडणूक आयोगातर्फे राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात ७ मे २०१८ रोजी राजकीय पक्षांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'राजकीय पक्षांद्वारे सशक्त लोकशाही' हा कार्यशाळेचा मुख्य विषय होता. मा. राज्य निवडणूक आयक्त श्री. ज. स. सहारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत दोन सत्रांत ही कार्यशाळा पार पडली.

राज्य निवडणूक आयोगाकडील सर्व २५१ राजकीय पक्षांना या कार्यशाळेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष व मंत्री महादेव जानकरदेखील यावेळी उपस्थित होते. उद्घाटन सत्रात श्री. सहारिया यांच्यासह आयोगाचे सचिव शेखर चन्ने, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी, प्रा. मानसी फडके आदी सहभागी झाले होते.

## संवादासाठी कार्यशाळा



श्री. शेखर चन्ने यांनी उद्घाटन सत्रात उपस्थितांचे स्वागत केले व कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विशद करताना पुढील मुद्दे मांडले:

- निर्भय, मक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका घेण्यात राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत मोलाची असते. त्यादृष्टीने संवाद साधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.
- लोकशाही सुदृढ करण्यासाठी राजकीय पक्षांनी चांगले उमेदवार उभे करणे अपेक्षित आहे.
- निवडणुकांत आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, गुंड

प्रवृत्तींना लांब ठेवणे, मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कृत्ये टाळणे, आचारसंहितेचे पालन करणे, पक्षांतर्गत लोकशाही असणे आदी मुद्यांवर या कार्यशाळेत चर्चा अपेक्षित आहे.


## उत्पन्नाचा स्त्रोत नमूद करणे आवश्यक



श्री. सहारिया यांनी ७३ व ७४ वी घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये, निवडणुकां - संदर्भातील चिंतेचे मुद्दे, अपेक्षित निवडणूक सुधारणा इत्यादी विषयांचा परामर्श घेतला. याबाबत व्यापक विचारमंथनाची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या सादरीकरणातील ठळक मुद्दे असे:

- ऐतिहासिक ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानिक दर्जा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सन १९९४ मध्ये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना.
- स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दर पाच वर्षांनी सुमारे २.५० लाख लोकप्रतिनिधींची निवड.
- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व शक्ती भारत निवडणूक आयोगाप्रमाणेच.
- राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे राज्य शासनावर बंधनकारक.
- आयोगाच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या २२० राजकीय पक्षांची नोंदणी रद्द.
- नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे संकेतस्थळाद्वारे भरण्याची सुविधा.
- उमेदवारांच्या शपथपत्राच्या गोषवाऱ्याला मतदान केंद्रांबाहेर ठळक प्रसिद्धी.
- मतदार जागृतीमुळे मतदार नोंदणीत आणि मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ.
- आर्थिक बळाचा गैरवापर, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार, मतदारांना प्रलोभने देण्याची प्रवृत्ती, पक्षांतर्गत लोकशाहीबाबत प्रश्नचिन्ह आदी मुद्दे चिंतेचे ठरत आहेत.
- न्यायालयाच्या निकालानुसार शपथपत्रांमध्ये उत्पन्नाचा स्त्रोत नमूद करणे आवश्यक.
- उमेदवारांच्या अर्हतेसंदर्भातील पात्रता, अटी व निकष व्यापक करण्याची आवश्यकता.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणुका घेण्याची गरज.
- राजकीय पक्षांसाठी खर्च मर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता.
- निवडणूक न लढविणाऱ्या राजकीय पक्षाबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता.

## 'मतदार संरक्षण कायद्या'ची गरज




डॉ. विश्वंभर चौधरी यांनी 'राजकीय पक्षांकडून अपेक्षा' या विषयावर भाष्य केले. निवडणूक यंत्रणेबाबतही त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे असे:

- 'भारतीय प्रशासकीय सेवा' व 'भारतीय पोलीस सेवे'च्या धर्तीवर 'इंडियन इलेक्शन सर्व्हिसेस' (IES) असावी. या अधिकाऱ्यांचा शासनाच्या आस्थापनेशी संबंध नसावा.

- निवडणूक जाहीरनाम्यातील अश्वासनांची पूर्ती होत नाही. त्यासाठी ग्राहक संरक्षणाप्रमाणे 'मतदार (मालक) संरक्षण कायदा'ची गरज आहे.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणूक घेण्यात यावी. फेरनिवडणुकीत सर्व जुने उमेदवार अपात्र ठरवावेत.
- टोटलाईझरचा वापर करून उमेदवारांना मिळालेली मते मतदान केंद्रनिहायऐवजी एकत्रितरीत्या जाहीर करावीत.
- मतदान यंत्रांबाबत शंका असल्यास त्यांचे निश्चितच निरसन केले पाहिजे.
- राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांबाबत पारदर्शकता असावी. देणग्यांमुळे हितसंबंधांचा (कॉंफ्लिक्ट ऑफ इंट्रेस्ट) प्रश्न निर्माण होतो. आयोगाने देणग्यांची किमान यादृच्छिक (रँडम) पद्धतीने तपासणी करावी.
- राजकीय पक्षांनी स्वत:हून माहिती अधिकाराखाली यायला हवे. ध्येय, धोरणांचा समावेश नसला तरी किमान त्यांचे आर्थिक व्यवहार माहिती अधिकारात असावेत.
- राजकीय पक्षांनी आपला जमा- खर्च संकेतस्थळावर स्वत:हून टाकावा. यातून पक्षांमध्ये पारदर्शकतेची स्पर्धा निर्माण होऊ शकते.
- जनता सक्षम होण्याऐवजी राजकीय पक्ष सक्षम होत आहेत.
- लिलावाद्वारे सरपंच निश्चित करून निवडणूक टाळण्याचा प्रकार गंभीर आहे. हा लोकशाहीच्या मूळ तत्वांवरच घाला आहे.
- राजकीय पक्षांना कायमस्वरूपी किमान आचारसंहिता असावी. फक्त ही आचारसंहिता अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आड येऊ नये.
- पक्षांतर्गत लोकशाही हा केवळ देखावा आहे. पक्षांतर्गत लोकशाहीला असलेला धोका मूळ लोकशाहीवरच घाला घालू शकतो.
- निवृत्तीनंतर काही अधिकारी लगेचच संबंधित पक्षात प्रवेश करतात; थेट निवडणुकाही लढवितात. निवृत्तीनंतर यात किमान दोन- तीन वर्षे खंड असावा.

## लोकप्रियतेबरोबर विश्वास महत्वाचा



डॉ. सुहास पळशीकर यांनी 'राजकीय पक्ष: प्रतिमा आणि अपेक्षा' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्वक व चिंतनशील विवेचन केले. त्यांच्या विवेचनातील ठळक मुद्दे असे:

- राजकीय पक्ष म्हणजे सत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी खुल्या स्पर्धेद्वारे प्रयत्न करणारे गट होय.
- लोकांना आपल्याकडे वळविण्यासाठी कार्यक्रम, धोरणे, विचारप्रणाली, घोषणा, प्रतीके, भावनिक आव्हाने, नेतृत्व, लोकसेवा इत्यादींची राजकीय पक्षांना गरज असते.
- स्वातंत्र्यपूर्व काळात विविध चळवळी, सुधारणा, वाटाघाटी, मर्यादित निवडणुका इत्यादींमधून राजकीय पक्षांची निर्मिती.
- स्वातंत्र्यानंतर संविधानाने प्रदान केलेल्या संघटना स्वातंत्र्याच्या बळावर व खुल्या निवडणूक पद्धतींमुळे राजकीय पक्षांना मोठा वाव.
- देशाचे नियंत्रण राजकीय पक्ष करतात; पण राजकीय पक्षांचे नियंत्रण कोण करतं? हा व्यवस्थेतील विरोधाभास आहे.
- आपणच आपले नियंत्रण करण्याचे भान न ठेवल्यास

व्यवस्था कोलमळते. तसे झाल्यास लोक विरोधात जातात.

- एका अभ्यासाच्या निष्कर्षानुसार सन २००५ मध्ये राजकीय पक्षांवर ३६ टक्के नागरिकांना विश्वास होता. सन २०१३ मध्ये ३७ टक्के लोकांनीच विश्वास दर्शविला.
- जागतिक विचार केल्यास तुलनेने भारतात लोकांचा राजकीय पक्षांवर जास्त विश्वास आहे, हे आपल्या राजकीय पक्षांचे श्रेय मानावे लागेल.
- राजकीय पक्ष सतत लोकांमध्ये असतात. तरीही पक्षांवर ठराविक लोकांचेच वर्चस्व असते. तरीही अनेक समूह प्रतिनिधित्वाविना राहतात.
- लोक राजकीय पक्षांवर विश्वास ठेवत नाहीत; पण आपल्या कामांसाठी पक्षांकडेच जातात. यावरच आपल्या देशाचे राजकारण चालते.
- लोकसभेच्या सन २००९ मधील निवडणुकीत ४६५; तर सन २०१४ मधील निवडणुकीत ३६३ पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी या दोन्ही निवडणुकांमध्ये केवळ ३६ पक्ष लोकसभेत दिसले. त्यातही दोन्ही निवडणुकांत २० पक्षांचे केवळ ३ किंवा त्यापेक्षा कमी सदस्य होते.
- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २००९ मधील निवडणुकीत २७३; तर सन २०१४ मधील निवडणुकीत २०२ पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी सन २००९ मध्ये १४; तर सन २०१४ मध्ये १२ पक्ष विधानसभेत दिसले. त्यातही सन २००९ च्या निवडणुकीत ७ आणि सन २०१४ च्या निवडणुकीत ८ पक्षांचे केवळ ३ किंवा त्यापेक्षा कमी सदस्य होते.
- पक्षाची संघटनबांधणी करण्यासाठी स्थानिक स्तरावरील यंत्रणा, संलग्न संघटनांचे जाळे, पक्षांतर्गत लोकशाही आणि सर्व कार्यकर्त्यांच्या अपेक्षांच्या संतुलनासाठी सजग राहावे लागते.
- राजकीय पक्षांना प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सतत लोकांच्या डोळ्यासमोर राहावे लागते; परंतु केवळ जाहिराती आणि एकाच नेत्याच्या आधारे पक्ष चालविण्याचा प्रयत्न चिरंतर यश देत नाही.
- भावनिक आव्हानांद्वारे यश संपादन करण्याचा कल अलीकडे जगभर दिसतो आहे. त्याबाबत अमेरिका, रशिया आणि तुर्कस्तानातील निवडणुकांत ही प्रारूपे विकसित होताना दिसली; पण ही प्रारूपे फार काळ टिकत नाहीत.
- लोकप्रियता मिळते; पण लोकांचा विश्वास मिळत नाही, अशा अवस्थेत राहायचे की विश्वास संपादन करायचा? हा महत्वाचा प्रश्न आहे.
- स्वत:चे व्यवसाय किंवा हितसंबंध राजकीय कामांच्या आणि भूमिकांच्या आड येणार नाहीत, याची काळजी घेणे महत्वाचे आहे.
- राजकीय पक्षांच्या देणगीदारांच्या अपेक्षांचा आणि लोकहित साधण्याचा समतोल महत्वाचा ठरतो. त्यासाठी हितसंबंधांचा संघर्ष (कॉन्फ्लिक्ट ऑफ इंट्रेस्ट) टाळायला हवा.
- भारतीय लोकशाहीच्या यशात राजकीय पक्षांचा मोठा वाटा आहे. मात्र लोकशाहीच्या विस्तारासाठी आणि तिची आशयघनता वाढविण्याची मोठी जबाबदारीही राजकीय पक्षांवर आहे.
- राजकीय क्षेत्रात सगळे लबाड किंवा वाईट नसतात; परंतु वाईट प्रवृत्तींनी चांगल्या प्रवृत्तींना हद्दपार केल्यास लोकशाही अडचणीत येऊ शकते.

## गंभीर गुन्हे व करोडपती उमेदवार

पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात केलेले संशोधन आणि असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मसने




**राजकीय पक्षांच्या कार्यशाळेतील खुल्या सत्रात उपस्थित प्रतिनिधींच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन करताना आयोगाचे सचिव शेखर चन्ने. शेजारी डावीकडून ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी, डॉ. सुनंदा तिडके, सीएलजीएफच्या अनुया कुवर, राजकीय अभ्यासक डॉ. मृदुल निळे.**



केलेल्या उमेदवारांच्या आर्थिक आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीसंदर्भातील विश्लेषणाचे प्रा. फडके यांनी सादरीकर केले. ते असे :

- राज्यातील महानगरपालिका निवडणुकीतील साधारणत: ९ टक्के उमेदवारांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे.
- बृहन्मुंबई आणि नाशिक महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक प्रत्येकी २९ टक्के उमेदवार करोडपती.
- बहुतांश उमेदवार राजकीयदृष्ट्या सक्रिय कुटुंबातील व उमेदवारी देताना गुणवत्तेपेक्षा राजकीय पार्श्वभूमीच्या निकषाला प्राधान्य.
- नगरविकासाची दूरदृष्टी असणारे उमेदवार राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे राजकीय व्यवस्थेपासून लांब.
- श्रीमंत उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकतात. खर्च मर्यादेपेक्षा कमीत कमी चौपट जास्तीचा खर्च करतात.

## खुले चर्चासत्र

उद्‌घाटन सत्रानंतर खुले चर्चासत्र झाले. यात श्री. चन्ने यांनी खुल्या चर्चासत्रात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन केले. आर.एस.सी.डी.चे संचालक भीम रासकर, राजकीय अभ्यासक डॉ. मृदुल निळे, डॉ. ए. एन. सिद्धेवाड, डॉ. सुनंदा तिडके, सीएलजीएफच्या अनुया कुवर आदींनी खुल्या चर्चासत्रात सहभाग घेतला.

या चर्चासत्रातील काही ठळक सूचना अशा:

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी ई-वोटिंग असावे. कुठूनही मतदान करता यावे. मतदानाचा एकच दिवस नसावा. मतदानाचे १५ दिवस असावेत.
- प्रसारमाध्यमांनी सर्व पक्षांना समान वागणूक द्यावी, यासाठी उपाययोजना कराव्यात.
- केवळ राजकीय पक्षांच्या उमेदवारांनाच निवडणूक लढण्याची संधी असावी.
- आधार कार्डशिवाय मतदार यादीत नाव नोंदविले जाऊ नये आणि मतदार यादीत नोंदविलेल्या नावाला आधारकार्ड जोडायला हवे.
- नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची सुविधा नसावी. त्यामुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते.
- सर्व पक्षांनी एकाच ठिकाणी येऊन प्रचार करावा. त्यासाठी आयोगाने बैठक किंवा सभा आयोजित करण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- आरक्षित जागेवरून निवडणूक लढविण्यासाठी लागणाऱ्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत कायमस्वरुपी एकच धोरण असावे.

## कार्यशाळेचा सारांश



कार्यशाळेत चर्चा झालेल्या विविध बाबींवर राज्य निवडणूक आयोगाने व शासनाने लवकरात लवकर कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे मत बहुतांश राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केले. त्यासंदर्भात कार्यवाही करावयाच्या मुद्द्यांचा सारांश मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मृदुल निळे यांनी समारोपप्रसंगी मांडला. तो असा:

- राजकीय पक्षांकडून मतदारांना देण्यात येणारी प्रलोभने आणि आमिष; तसेच आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळण्यासाठी सक्षम कायदा आवश्यक आहे.
- पक्षांतर्गत लोकशाही सुदृढ करण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढाकार घ्यावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या धर्तीवर कायदा तयार करावा.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात कुठल्याही प्रकारचा फेरफार करता येत नाही; परंतु त्याबाबत गैरसमज असल्यास ते दूर करण्यासाठी जनजागृती करण्यात यावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीची उमेदवारांकरिता पात्रता, अनर्हतेचे निकष, निवडणुकीसंदर्भातील गुन्हे, भ्रष्ट मार्गाचा अवलंब इत्यादींसंदर्भात व्यापक विचार करावा.
- सर्वोच्च न्यायालयाच्या (रिट पिटीशन सीव्हील नं.७८४/२०१५) निकालाच्या अनुषंगाने उमेदवाराने सादर करावयाच्या शपथपत्रामध्ये सुधारणा करणे.
- निवडणूक न लढविणे, जाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्तता न करणे, खर्चाचा हिशोब वेळेत सादर न करणे आदी कारणांसाठी राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणे.
- राजकीय पक्षांसाठी खर्चाची मर्यादा निश्चित करणे.
- एकापेक्षा जास्त जागेवर निवडून आलेल्या उमेदवाराने इतर जागांचा राजीनामा दिल्यास त्यांच्याकडून रिक्त जागांच्या पोट निवडणुकीचा खर्च वसूल करणे.

वरील मुद्द्यांबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून कार्यवाही होण्याची आवश्यकता असल्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यशाळेत आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'चेही प्रकाशन करण्यात आले. डॉ. निळे यांनी सूत्रसंचालन केले. आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे यांनी आभार मानले.

# सार्वत्रिक आणि पोटनिवडणुका

विविध जिल्ह्यांमधील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या; तसेच ग्रामपंचायतींच्या गेल्या सहा महिन्यांत सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. त्याचबरोबर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या रिक्तपदांसाठी पोटनिवडणुकाही घेण्यात आल्या.

## नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका

राज्य निवडणूक आयोगाने ५ मार्च २०१८ रोजी ६ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार गुहागर, देवरूख (जि. रत्नागिरी), कणकवली (जि. सिंधुदुर्ग), आजरा (जि. कोल्हापूर), जामनेर (जि. जळगाव) व वैजापूर (जि. औरंगाबाद) या नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी ६ एप्रिल २०१८ रोजी मतदान व ७ एप्रिल २०१८ रोजी मतमोजणी होणार होती; परंतु न्यायालयीन निकालाच्या अनुषंगाने या कार्यक्रमात बदल करण्यात आला.

बदलानुसार गुहागर व देवरूख नगरपंचायतींसाठी ६ ऐवजी ११ एप्रिल २०१८ रोजी मतदान घेण्यात आले. त्याचबरोबर कणकवली नगरपंचायतीतील प्रभाग क्र. १० मध्ये सदस्य व अध्यक्षपदासाठी; तसेच जामनेर नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.७ मध्ये सदस्य व अध्यक्षपदासाठीदेखील ११ एप्रिल २०१८ रोजी मतदान झाले. उर्वरीत सर्व ठिकाणी पूर्व नियोजनाप्रमाणे ६ एप्रिल २०१८ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. रत्नागिरी, आळंदी, तासगाव, दुधनी, सावदा, कुंडलवाडी व

## एप्रिल २०१८ मध्ये झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचे निकाल

| अ.क्र. | नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे नाव | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | शिवसेना | मनसे | इतर | अपक्ष राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | एकूण | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | गुहागर | १७ | ६ | १ | ० | १ | ० | ० | ९ | १७ | अपक्ष |
| १८ | देवरुख | १७ | ७ | ३ | १ | ४ | १ | ० | १ | १७ | भाजपा |
| १९ | कणकवली | १७ | ३ | १ | ० | ३ | ० | १० | ० | १७ | म.स्वा.प. |
| २० | आजरा | १७ | ० | ३ | २ | १ | ० | ९ | २ | १७ | ताराराणी आघाडी |
| २१ | जामनेर | २४ | २४ | ० | ० | ० | ० | ० | ० | २४ | भाजपा |
| २२ | वैजापूर | २३ | ९ | ० | १ | १३ | ० | ० | ० | २३ | भाजपा |
| | **एकूण** | **११५** | **४९** | **८** | **४** | **२२** | **१** | **१९** | **१२** | **११५** | |

कळंब या नगरपरिषदा/ नगरपंचायतींतील प्रत्येकी एका रिक्तपदासाठीदेखील ६ एप्रिल २०१८ रोजी मतदान झाले.

निवडणूक कार्यक्रमातील बदलानुसार ११ एप्रिल २०१८ रोजी होणाऱ्या मतदानावर प्रभाव पडू नये म्हणून या सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांची संपूर्ण मतमोजणी १२ एप्रिल २०१८ रोजी घेण्यात आली.

## महानगरपालिका पोटनिवडणूक

बृहन्मुंबई महानगरपालिकेसह ६ महानगरपालिकांमधील प्रत्येकी एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी ६ एप्रिल २०१८ रोजी मतदान झाले. ७ एप्रिल २०१८ रोजी मतमोजणी पार पडली. यात बृहन्मुंबई व्यतिरिक्त नाशिक, सोलापूर, पुणे, अहमदनगर व उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रत्येकी एका रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीचा समावेश होता. महानगरपालिकानिहाय पोटनिवडणूक झालेल्या प्रभागाचे नाव व उमेदवारांची संख्या : बृहन्मुंबई- ३, नाशिक- ८ सोलापूर- ९, पुणे- ५,अहमदनगर-३ आणिउल्हासनगर- ४.

## जि. प./ पं. स.पोटनिवडणूक

वर्धा व उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी एका रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी आणि विविध ११ पंचायत समित्यांच्या निर्वाचक गणांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांकरिता ६ एप्रिल २०१८ रोजी मतदान घेण्यात आले. मतमोजणी ७ एप्रिल २०१८ रोजी पार पडली.

पोटनिवडणूक झालेले जिल्हा परिषदेचे निवडणूक विभाग: हमदापूर (ता. सेलू, जि. वर्धा) आणि आनाळा (ता. परंडा, जि. उस्मानाबाद). पोटनिवडणूक झालेले पंचायत समित्यांचे निर्वाचक गण: पिंगुळी (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग), नगाव (ता. जि. धुळे), तुर्काबाद (ता. गंगापूर, जि. औरंगाबाद), संवदगाव (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद), सगरोळी (ता. बिलोली, जि. नांदेड), मारतळा (ता. लोहा, जि. नांदेड), काटी (ता, तुळजापूर, जि. उस्मानाबाद), सौंदड (ता. सडक-अर्जुनी, जि. गोंदिया), आजंती (ता. हिंगणघाट, जि. वर्धा), घुग्घुस-२ (ता. जि. चंद्रपूर) आणि मानापूर (ता. आरमोरी, जि. गडचिरोली).

## ग्रामपंचायतींच्या निवडणुका

राज्यातील विविध जिल्ह्यांतील २७ फेब्रुवारी २०१८ रोजी ३१२; तर २७ मे २०१८ रोजी ६६२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान घेण्यात आले. या निवडणुकांसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडली. गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात मात्र केवळ दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती. सर्व ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली.

### लोकसभा पोटनिवडणुकीमुळे बदल

पालघर, भंडारा व गोंदिया हे तीन जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यांतील सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २८ मे २०१८ रोजी पार पडली; परंतु पालघर, भंडारा व गोंदिया या तीन जिल्ह्यांत लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी २८ मे २०१८ रोजीच मतदान होणार होते. त्यामुळे या जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांची मतमोजणी २८ मे २०१८ ऐवजी ४ जून २०१८ रोजी करण्यात आली.

# तयारी महानगरपालिका निवडणुकांची

धुळे, जळगाव, अहमदनगर आणि सांगली– मीरज– कुपवाड महानगरपालिकांच्या मुदती आगामी काळात संपत आहेत. त्यामुळे सध्या त्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. डिसेंबर २०१८ अखेर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. सांगली– मीरज– कुपवाड आणि जळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी प्रभाग व आरक्षण निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

## १ ऑगस्टला मतदान

सांगली– मीरज– कुपवाड महानगरपालिकेची मुदत १३ ऑगस्ट २०१८ रोजी संपत आहे. या महानगरपालिकेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ७ जुलै २०१३ रोजी मतदान झाले होते. आता या महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागातील ७८ जागांसाठी १ ऑगस्ट २०१८ रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी ३ ऑगस्ट २०१८ रोजी होईल.

जळगाव महानगरपालिकेची मुदत १९ सप्टेंबर २०१८ रोजी संपत आहे. या महानगरपालिकेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १ सप्टेंबर २०१३ रोजी मतदान झाले होते. आता या महानगरपालिकेच्या एकूण १९ प्रभागातील ७५ जागांसाठी १ ऑगस्ट २०१८ रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी ३ ऑगस्ट २०१८ रोजी होईल.

धुळे महानगरपालिकेची मुदत २९ डिसेंबर २०१८ रोजी संपत आहे. या महानगरपालिकेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ डिसेंबर २०१३ रोजी मतदान झाले होते. आता या महानगरपालिकेच्या एकूण १८ प्रभागातील ७० जागांसाठी मतदान होणार आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची मुदत २९ डिसेंबर २०१८ रोजी संपत आहे. या महानगरपालिकेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ डिसेंबर २०१३ रोजी मतदान झाले होते. आता या महानगरपालिकेच्या एकूण १७ प्रभागातील ६८ जागांसाठी मतदान होणार आहे. त्याची तयारी सुरू आहे.

## सन २०१३ मधील महानगरपालिका निवडणुकीतील पक्षीय बलाबल

| अ.क्र. | महानगर पालिकेचे नाव | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | रा. नि. आ. कडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली | ७८ | ० | १९ | ४१ | ० | ० | १ | ० | ८ | ९ |
| २ | जळगाव | ७५ | १५ | ११ | ० | ० | ० | १२ | ० | ३६ | १ |
| ३ | धुळे | ७० | ३ | ३४ | १० | १ | ११ | ० | ३ | १ | ७ |
| ४ | अहमदनगर | ६८ | ९ | १८ | ११ | ० | १७ | ४ | ० | ० | ९ |
| | **एकूण** | **२९१** | **२७** | **८२** | **६२** | **१** | **२८** | **१७** | **३** | **४५** | **२६** |

# आगामी जि. प. आणि पं. स. निवडणुका

धुळे, नंदुरबार, अकोला आणि वाशीम जिल्हा परिषदेची मुदत आगामी काळात संपत आहेत. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागांची आणि पंचायत समित्यांच्या निर्वाचक गणांची रचना (प्रभाग रचना) आणि आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू आहे.

धुळे, नंदुरबार अकोला आणि वाशीम जिल्हा परिषदेची मुदत २९ डिसेंबर २०१८ रोजी संपत आहे. धुळे, नंदुरबार, अकोला आणि वाशीम जिल्हा परिषदांतर्गतच्या पंचायत समित्यांची मुदत २७ डिसेंबर २०१८ रोजी संपत आहे. तयारीची लगबग सुरू आहे.

## जिल्हा परिषदेच्या सन २०१३ मधील निवडणुकांतील पक्षीय बलाबल

| जिल्हा | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(एम) | इंडियन नॅशनल काँग्रेस | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील पक्ष | रा.नि.आ. कडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धुळे | ५६ | १३ | ० | ३० | ७ | २ | ० | ० | ० | ४ | ५६ |
| नंदुरबार | ५५ | १ | ० | २९ | २५ | ० | ० | ० | ० | ० | ५५ |
| अकोला | ५६ | ११ | ६ | ५ | २ | २ | ० | ३ | २२ | ५ | ५६ |
| वाशीम | ५२ | ६ | ० | १६ | ८ | ९ | ४ | ३ | ० | ६ | ५२ |
| **एकूण** | **२१९** | **३१** | **६** | **८०** | **४२** | **१३** | **४** | **६** | **२२** | **१५** | **२१९** |

## पंचायत समित्यांच्या सन २०१३ मधील निवडणुकांतील पक्षीय बलाबल

| जिल्हा | पंचायत समित्या | एकूण जागा | बहुजन समाज पार्टी | भारतीय जनता पार्टी | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | इंडियन नॅशनल काँग्रेस | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील पक्ष | रा.नि.आ. कडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धुळे | ४ | ११२ | ० | २३ | ० | ५१ | १९ | ९ | ० | ० | ० | १० |
| नंदुरबार | ६ | ११० | ० | २ | १ | ५८ | ४८ | ० | ० | ० | ० | १ |
| अकोला | ७ | १०६ | ० | २१ | ० | १३ | ६ | १५ | ० | ७ | ४१ | ३ |
| वाशीम | ६ | १०४ | १ | १६ | ० | १७ | २७ | १८ | ७ | ० | ७ | ११ |
| **एकूण** | **२३** | **४३२** | **१** | **६२** | **१** | **१३९** | **१००** | **४२** | **७** | **७** | **४८** | **२५** |

# 'न्यूटन'मधला निवडणुकीचा थरार

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठात नोव्हेंबर २०१७ मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनात स्वयंसेवक म्हणून काम केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण आणि निवडणूक या विषयावरील 'न्यूटन' सिनेमाचा विशेष खेळ ४ एप्रिल २०१८ रोजी आयोजित करण्यात आला होता. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे सचिव शेखर चन्ने, नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुधा मोहन, डॉ. मृदुल निळे यावेळी उपस्थित होते. चित्रपट समीक्षक मंदार जोशी यांचे याप्रसंगी 'चित्रपट कलाकृतीचा आस्वाद' या विषयावर व्याख्यान झाले.

विद्यापीठाच्या ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरीयममध्ये हा कार्यक्रम झाला. राज्य निवडणूक आयोग आणि मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागातर्फे हा कार्यक्रम झाला. दृश्यम फिल्म्स या कंपनीतर्फे न्यूटन हा सिनेमा या विशेष खेळासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आला होता. राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी, कर्मचारी व नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई विद्यापीठात ४ एप्रिल २०१८ रोजी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण आणि निवडणूक या विषयावरील 'न्यूटन' सिनेमाचा विशेष खेळ आयोजित करण्यात आला होता. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्यासह आयोगाचे सचिव शेखर चन्ने, नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुधा मोहन, चित्रपट समीक्षक मंदार जोशी यावेळी उपस्थित होते.**



कुठल्याही कलाकृतीच्या निर्मितीत असंख्य हातांचे योगदान असते. चित्रपट निर्मिती हा तर प्रचंड मोठा व्याप असतो. सुरूवात कथा लेखनापासून सुरू होते. कथा लेखक, पटकथा लेखक, निर्माता, दिग्दर्शक, कलावंत, छायाचित्रकार, तंत्रज्ञ असे अनेक लोक यात गुंतलेले असतात. त्यांच्या अनुभवाचा व कौशल्याचा अंतिम अविष्कार सिनेमा असतो. कायिक आणि वाचिक अभिनयातून कलावंत बरचं काही सांगून जातात. दिग्दर्शक प्रतीकांद्वारे लेखकाची कथा जीवंत करतो. सिनेमा डोळसपणे पाहिल्यास किंवा पडद्यावरच्या बारीक सारीक गोष्टी बारकाईने टिपल्यास आपण त्या कलाकृतीचा खऱ्या अर्थाने आस्वाद घेऊ शकतो.

**– श्री. मंदार जोशी**

# आंतरराष्ट्रीय पातळीवर देवाणघेवाण आवश्यक

राज्य निवडणूक आयोगातर्फे १ फेब्रुवारी २०१८ रोजी सह्याद्री अतिथिगृहात मुंबईतील विविध देशांच्या महावाणिज्य दुतांची परिषद (कौन्सुलेट जनरल) आयोजित केली होती. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी यावेळी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत सादरीकरण केले.

राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव सुमीत मल्लीक, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजगोपाल देवरा, आयोगाचे सचिव शेखर चन्ने परिषदेस उपस्थित होते. अमेरिकेचे एडगार्ड डॅनीयल केगेन, स्वीत्झरलँडचे मार्टिन बेंच, तुर्किच्या गॅम्झ केडरॉग्ल्यू, व्हीएतनामच्या ट्रॅन ऊअन थुए, हंगेरीचे डॉ. नोबर्ड रिवाई- बेरे, ऑस्ट्रेलियाचे मार्टिन हूबर, बांगलादेशचे लूटफोर रहमान, ब्राझीलच्या रोसिमर दासिल्वा सुझान, इंडोनेशियाचे यादीसुरिया हायदी, मलेशियाचे झैनल अझलान बीन मोहोद नादझिर काल आदींनी परिषदेत सहभाग घेतला.

सादरीकरण प्रसंगी श्री. सहारिया म्हणाले की, भारतात केंद्रीय स्तरावरील लोकसभा व राज्यसभा; तसेच राज्य स्तरावरील विधानसभा व विधानपरिषदेच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जातात. स्थानिक स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जातात.

राज्यातील सुमारे २८ हजार स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दर पाच वर्षांकरिता सुमारे २ लाख ५० हजार सदस्यांची निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. या निवडणुका अधिक गुंतागुंतीच्या आणि चुरशीच्या असतात. त्यामुळे अधिक दक्षता घ्यावी लागते. या निवडणुका अधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. एकूणच यासंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर देवाणघेवाण होण्याची आवश्यकता आहे, असे मत श्री. सहारिया यांनी व्यक्त केले.

विविध देशांच्या प्रतिनिधींनी आपापल्या देशांतील निवडणूक संदर्भातील माहिती दिली; तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक विचारमंथन व नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत आदानप्रदान होण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.




**राज्य निवडणूक आयोगातर्फे १ फेब्रुवारी २०१८ रोजी मुंबई येथे आयोजित विविध देशांच्या महावाणिज्य दुतांच्या परिषदेत बोलताना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया. शेजारी डावीकडून स्वीडनचे महावाणिज्य दूत डॉ. नोबर्ट रेवाई बेरे, तत्कालीन मुख्य सचिव सुमीत मल्लीक, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजगोपाल देवरा, आयोगाचे सचिव शेखर चन्ने व विविध देशांचे प्रतिनिधी.**

# श्रीलंकेच्या शिष्टमंडळाची भेट

श्रीलंकेतील सबरगामुवा प्रांताच्या मुख्य सचिव हेरत पी. कुलारथने यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने ६ एप्रिल २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास भेट देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील माहिती जाणून घेतली. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले.

कॉमनवेल्थ लोकल गव्हरमेंट फोरम आणि रिसोर्स अँड सपोट सेंटर फॉर डेव्हल्पमेंटतर्फे (आरएससीडी) या शिष्टमंडळाच्या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. सबरगामुवा प्रांताच्या मुख्यमंत्र्यांच्या सचिव श्रीयानी पद्मलथा, स्थानिक स्वराज्य संस्था आयुक्त बी. ए. सी. पी. बामुनुअराची, सहायक आयुक्त डब्ल्यू. जी. एन. समाना कुमारा, एल. एम. पी. डब्ल्यू. बंडारा आदींचा शिष्टमंडळात समावेश होता. कॉमनवेल्थ लोकल गव्हर्न्मे ट फोरमच्या आशिया विभागाच्या प्रमुख अनुया कुवर, आरएससीडीचे संचालक भीम रासकर, महिला राजसत्ता आंदोलनाच्या राज्य समन्वयक मालती सगणे, श्री. दत्ता गुरव, श्री. चेतन वाघ, श्रीमती रजनी जॉर्ज आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया, त्यासंदर्भातील कायदे व राज्य निवडणूक आयोगाची कार्यपद्धती याबाबत श्री. चन्ने यांनी माहिती दिली. निवडणूक प्रक्रियेतील तंत्रज्ञानाचा वापर, मतदार जागृती मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न, निवडणुकीतील अनुचित प्रकार आणि पैशांच्या गैरवापराला प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या उपाययोजना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधनाला दिलेली चालना याबाबतही श्री. चन्ने यांनी शिष्टमंडळाला अवगत केले.

श्रीलंकेतील स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत व त्यांच्या निवडणुकांसंदर्भात शिष्टमंडळाने माहिती दिली. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे शिष्टमंडळाने कौतुक केले.



**श्रीलंकेतील सबरगामुवा प्रांताच्या मुख्य सचिव हेरत पी. कुलारथने यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने ६ एप्रिल २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास भेट दिली. त्यांच्याशी विचारविनिमय करताना राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने व इतर अधिकारी**




राज्य निवडणूक आयोगातर्फे राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त मुंबई येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात ७ मे २०१८ रोजी आयोजित राजकीय पक्षांच्या कार्यशाळेत आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'चे प्रकाशन करण्यात आले. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्यासह राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष व मंत्री श्री. महादेव जानकर, आयोगाचे सचिव श्री. शेखर चन्ने, डॉ. सुहास पळशीकर, डॉ. विश्वंभर चौधरी आदी यावेळी उपस्थित होते.





## राज्य निवडणूक आयोग

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.

०२२ २२०४६९०९

sec.mh@gov.in / mahasecpro@gmail.com

https://mahasec.maharashtra.gov.in

https://mahasecnews.blogspot.in

https://www.instagram.com/maharashtrasec

https://www.facebook.com/MaharashtraSEC

https://www.twitter.com/maharashtrasec

https://www.youtube.com/channel/UCBecPYpVQš1P8-ZqMUlG-1w

सत्यमेव जयते

# निवडणूक वार्ता